# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

**मुख्य कार्यालय :** चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

झो.पु.प्रा
निश्चयेन परिवर्तनम्।
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

O/C

717

जा.क्र. झोपुप्रा/तां-२/अंभोप्र/मा.क्र.४४/१३८४/२०२४
दि. २८/०५/२०२४

## अंशत: भोगवटा प्रमाणपत्र (विंग-A)

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad

वाचा -

१. मूळ बांधकाम परवानगी क्र.झोपुप्रा/१००७/२०१४ दि.१०/११/२०१४.
२. सुधारित बांधकाम परवानगी क्र.झोपुप्रा/६३/२०१६ दि.१२/०१/२०१६.
३. सुधारित बांधकाम परवानगी क्र.झोपुप्रा/१०७२/२०२० दि.१५/०९/२०२०.
४. सुधारित बांधकाम परवानगी क्र. झोपुप्रा/२३५४ दि. १५/१२/२०२३.
५. योजनेचे वास्तुविशारद यांचा दि.२४/०१/२०२४ भोगवटा मागणी प्रस्ताव.
६. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता दि. २७/०५/२०२४
७. Final Fire Noc no. FB/४८०८ दि. ०५/०१/२०२४.

---

पुणे पेठ, ताडीवाला रोड, पानमळा, फायनल प्लॉट नं. १०३ (पै), (स.नं. ४५०/२अ/१/१ व ४५०/२अ/२) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन इमारतीकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ४५ अन्वये वर नमूद वाचा नुसार दि.१५/१२/२०२३ रोजी सुधारित बांधकाम परवानगी मंजूर करणेत आलेली आहे. मंजूर बांधकाम परवानगीप्रमाणे पुनर्वसन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्याने वास्तुविशारदांकडील दि.१९/०२/२०२४ रोजीचे बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रासह विकसकांकडून प्राप्त प्रस्तावास अनुसरून खालील तपशीलानुसार पुनर्वसन इमारतीस अंशत: भोगवटा प्रमाणपत्र मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या संदर्भीय ६ नुसार मान्यतेने देणेत येत आहे.सदर इमारतीस संदर्भ क्र. ७ अन्वये Final Fire Noc देण्यात आली आहे.

मंजूर बांधकाम नकाशानुसार पूर्ण झालेल्या पुनर्वसन इमारतीचा मजलेनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

विंग A - (पुनर्वसन)

| अ.क्र. | मजले | मंजूर नकाशानुसार | | | | एकूण सदनिका / दुकाने |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पुनर्वसन घटक | | विक्री घटक | | |
| | | Resi. | Comm. | Resi. | Comm. | |
| १) | ग्राउंड फ्लोअर | दुकान क्र. १ ते ११ + पार्किंग + ०१ बालवाडी + ०१ वेलफ़ेअर सेंटर + ०१सोसायटी ऑफिस + ०१टॉयलेट | | -- | -- | ११ दुकाने + पार्किंग + ०१ बालवाडी + ०१ वेलफ़ेअर सेंटर + ०१ सोसायटी ऑफिस + ०१ टॉयलेट |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २) | पहिला | सदनिका क्र. १०१ ते ११२ | -- | -- | -- | १२ सदनिका |
| ३) | दुसरा | सदनिका क्र. २०१ ते २१२ | -- | -- | -- | १२ सदनिका |
| ४) | तिसरा | सदनिका क्र. ३०१ ते ३१२ | -- | -- | -- | १२ सदनिका |
| ५) | चौथा | सदनिका क्र. ४०१ ते ४१२ | -- | -- | -- | १२ सदनिका |
| ६) | पाचवा | सदनिका क्र. ५०१ ते ५१२ | -- | -- | -- | १२ सदनिका |
| ७) | सहावा | सदनिका क्र. ६०१ ते ६१२ | -- | | -- | १२ सदनिका |
| ८) | सातवा | सदनिका क्र. ७०१ ते ७१२ | -- | | | १२ सदनिका |
| ९) | आठवा Refuge area | सदनिका क्र. ८०१ ते ८०५, ८०८ ते ८१२ + Refuge area | -- | -- | -- | १० सदनिका + Refuge area |
| १०) | नववा | सदनिका क्र. ९०१ ते ९१२ | -- | | -- | १२ सदनिका |
| ११) | दहावा | १००१ ते १०१२ | -- | -- | -- | १२ सदनिका |
| १२) | अकरावा | ११०१ ते १११२ | -- | -- | -- | १२ सदनिका |
| १३) | बारावा | १२०१ ते १२१२ | -- | -- | -- | १२ सदनिका |
| १४) | तेरावा | १३०१ ते १३१२ | -- | -- | -- | १२ सदनिका |
| | **एकूण** | **१५४ सदनिका** | -- | ११ दुकाने | -- | **१६५ सदनिका** |

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

**पुनर्वसन घटक सदनिका :-**

निवासी सदनिका :- १५४ सदनिका

बिगर निवासी सदनिका :- ११ दुकाने

**एकूण :- १५४ सदनिका + ११ दुकाने + ०१ बालवाडी + ०१ वेलफेअर सेंटर + ०१ सोसायटी ऑफिस + १ टॉयलेट पार्किंगसह**

अटी व शर्ती

715

१) सामासिक अंतरातील सार्वजनिक शौचालय काढणेत यावे, त्याशिवाय योजनेचे अंतिम भोगवटाप्रमाणपत्र अदा केले जाणार नाही.

२) अंशत: भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वाढीव बांधकाम केल्याचे आढळून आल्यास सदर बांधकाम अनधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार कारवाई करण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) फायनल फायर एन.ओ.सी क्र.FB/४८०८ दि.०५/०१/२०२४ मधील अटी व शर्तींची पूर्तता विकसकांवर बंधानकारक राहील.

५) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

६) इमारतीसभोवतीचे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open spaces) कायम खुले ठेवणे बंधनकारक आहे.

७) प्रकल्पांतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

८) विकास योजना रस्तारूंदीकरणाखालील क्षेत्र अंतिम भोगवटा मागणीपुर्वी संबंधित महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे विकसकावर बंधनकारक राहील.

९) पूर्व बाजूकडील सिमा भिंतीचे बांधकाम अंतिम भोगवटा अदा करणेपुर्वी पुर्ण करणे विकसकावर बंधनकारक राहील.

१०) पुनर्वसन इमारतीमधील ११४ सदनिका व ११ दुकाने वाटपाबाबत निर्णय होईपर्यंत, इमारतीमधील पूर्ण झालेल्या सदनिकांच्या सुरक्षेची जबाबदारी, विकसकावर राहील.

११) सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या स्थापने अंती सदनिका वितरण कार्यवाही पुढील एक महिन्यात पार पाडणे.

१२) अंशत: भोगवटा प्रमाणपत्रासाठी प्रस्तावासोबत सादर केलेली कागदपत्रे चुकीची/खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात आढळून आल्यास, भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

{ मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता दि.२७/०५/२०२४ }

Slum Rehabilitation Authority, Technical Department, APPROVED, Pune-Pimpri-Chinchwad Area

सहायक संचालक नगररचना,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

प्रत :- १) मे.बेलवलकर हौसिंग कंपनी.
११७५/१, निर्मिती एमिनीयन्स, ४था मजला, मेहंदळे गॅरेज जवळ, एरंडवणा, पुणे ०४.
२) आर्कि.जगदीश देशपांडे, A-१, सक्सेस चेंबर्स, १२३२, आपटे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे-४
३) तहसिलदार, ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव.